# आम्ही, भारताचे लोक

भारतामध्ये 'नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयका'विरोधात सध्या सुरू असलेल्या निदर्शनांमधून आपण 'वुई, द पीपल' ('आम्ही, भारताचे लोक') या भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेतील प्रारंभिक शब्दांचे किमान दोन अर्थ समोर येतात. प्रस्तावनेच्या आरंभीचे हे शब्द काही प्रमाणात अमूर्त स्वरूपाचे आहेत, कारण त्यात कोणा एका व्यक्तीला वा सामाजिक गटांना संबोधित केलेलं नाही. प्रत्येक सामाजिक गटातील प्रवक्त्याच्या मध्यस्थीने तयार झालेल्या राज्यघटनेला लोकांचा पाठिंबा गृहित धरून २६ जानेवारी १९५० रोजी या उक्तीचा उच्चार झाला, पण ते एक कल्पित प्रमेय होतं.

'आम्ही, भारताचे लोक' या शब्दप्रयोगातून चुकीचा अर्थ निघत नसला, तरी अमूर्त अर्थ निघतो. २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेवर शिक्कामोर्तब झालं, त्याच्या पूर्वसंध्येला भारतामध्ये असलेल्या सर्वांना उद्देशून यातील 'वुई'/'आम्ही' हे संबोधन वापरलं आहे. 'आम्ही' म्हणजे वरच्या शब्दप्रयोगामध्ये सामावलेले आणि सर्वसाधारण ओळख सामायिक असलेले लोक– मग त्यांचा धर्म, प्रदेश, जात व लिंगभाव यांबाबतीतला कल काहीही असला, तरी ते भारतातीलच आहेत. परंतु, घटनानिर्मितीच्या व्यापक प्रक्रियेमध्ये भिन्न आवाजांच्या अनेक अभिव्यक्ती समाविष्ट झालेल्या आहेत, हे ऐतिहासिक सत्य आहे. पण या वेगवेगळ्या आवाजांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या नेत्यांना प्रस्तावनेत रुजलेल्या मूळ अर्थाबाबत एकमत साधावं लागलं. मूळ अर्थ राज्यघटनेतील मूलभूत तत्त्वांनाही लागू होतो. सार्वभौम, समाजवादी, इहवादी व लोकशाही असण्याचं महत्त्व लोकांनी स्वीकारावं, अशी सैद्धान्तिक तरतूद यातून करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, 'आम्ही' म्हणजे या तत्त्वांचं समर्थन करणारा समूह. अशा प्रकारे एकमताने 'आम्ही, लोक' / 'वुई, द पीपल' ही संकल्पना किंवा शब्दप्रयोग साकारला.

घटनाकर्त्यांनी १९५०मध्ये हा शब्दप्रयोग स्वीकारून राज्यघटनेच्या प्रस्तावनेत त्याला जागा दिली, पण 'वुई, द पीपल'चा अचूक अर्थ मात्र त्यांनी ठोसपणे स्पष्ट केलेला नाही. 'नागरिक' या अधिक ठोस ओळखीची अधिक सार्वत्रिक ओळख लावून त्यातून बहुधा हा अर्थ लावण्याची गरज होती. प्रस्तावनेतील 'नागरिक' शब्द बराचसा तांत्रिक आहे आणि राज्यघटनेत त्याला अचूक स्थान आहे, हे वेगळं नमूद करायला नको. विशिष्ट घटनात्मक तरतुदींच्या मर्यादेत नागरिकांना असलेल्या अधिकारांसंदर्भात नागरिक असण्याची व्याख्या केलेली आहे. तर, 'आम्ही, भारताचे लोक'सारख्या अधिक व्यापक व अमूर्त अभिव्यक्तीचा परिणाम नागरिकत्वामध्ये दिसतो. त्यामुळे राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'आम्ही, भारताचे लोक' या शब्दप्रयोगानंतरच सिटिझन / नागरिक हा शब्द येतो. समतापूर्ण आणि पर्यायाने राज्यघटनेतील मूलभूत तत्त्वांचा स्वीकार करण्याबाबतचं सर्वसाधारण एकमत या शब्दप्रयोगातून प्रतिबिंबित होतं. तर, 'वुई, द पीपल' यामध्ये राज्यघटनेचा मूळ अर्थ स्वीकारण्याचा भाव आहे. या संदर्भात हे लक्षात घ्यायल हवं की, असा

अर्थ घटनाकर्त्यांच्या हेतूमधून आलेला नाही, तर लोकांच्या जीवनानुभवाबाबत त्यांच्या प्रामाणिक जागरूकतेमधून हा अर्थ आलेला नाही. एका अर्थी हा जीवनानुभव शोकात्म होता, कारण त्यात दलितांचं शोषण, स्त्रियांचं अंकितत्त्व आणि आदिवासींची भयंकर वगळणूक होती. दुसऱ्या पातळीवर हा जीवनानुभव ऊर्जा पुरवणारा होता, कारण सांस्कृतिक अवकाशातील मानवी वैविध्य त्यातून समोर येत होते. राज्यघटनेने वंचितांना समतेचं आश्वासन दिलं आणि विशेषाधिकारी गटांना सामाजिक अव्यवस्थेपासूनच्या सुरक्षेचं आश्वासन दिलं.

'नागरिकत्व सुधारणा कायद्या'विरोधातील निदर्शनांमध्ये 'आम्ही, भारताचे लोक' या शब्दप्रयोगाचे प्रतिध्वनी पुन्हा एकदा उमटत आहेत. राज्यघटनेच्या मूळ अर्थातील मूलभूत तत्त्वांचं समर्थन करण्यापुरती ही निदर्शनं मर्यादित राहिलेली नाहीत, तर मूळ अर्थ बजावून सांगणारी ही निदर्शनं आहेत. 'आम्ही, भारताचे लोक' या मूळ अभिव्यक्तीची पुनर्स्थापना या निदर्शनांमधून होते आहे. राज्यघटनेचा मूळ अर्थ वा प्राथमिक तत्त्वं यांचा बचाव करण्यासाठी प्रजासत्ताक अधिसत्ता मांडण्याचं काम या निदर्शनांमधून होतं आहे. घटनाकर्त्यांसोबतच राज्यघटनेचा प्रतीकात्मक उत्सव साजरा केल्याने राज्यघटनेच्या मूळ आदर्शलक्ष्यी अर्थाबद्दलची बांधीलकी अधिक घट्ट झाली आहे. 'आम्ही, भारताचे लोक' हा शब्दप्रयोग सार्वजनिक अवकाशात पुन्हा उदयाला येतो आहे. 'वुई' / 'आम्ही' हा शब्द, सध्याच्या संदर्भात, राज्यघटनेच्या पाठीशी उभं ठाकण्याचा नैतिक निर्धार व्यक्त करणारा ठरला आहे. 'महा सार्वभौम' सत्ताधीशांपुढे शरणागती न पत्कारण्याचा हा निर्धार दिसतो आहे. ●


**परिवर्तनाचा वाटसरू मिळण्याची ठिकाणे**

**मीडिया ॲडस्**
द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉम्प्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

**हरिष बुक स्टॉल**
न्यू बस स्टँड, अकोला
भ्र. ९८२२२३३२६४

**पीपल्स बुक हाऊस**
मेहेर हाऊस,
१५, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट
मुंबई ४११००१
दू. ०२२ २२८७३७६८

**युनिक बुक्स**
युनिक ॲकॅडमी, देवीदास आर्केड, पंचवटी चौक, मोर्शी रोड,
अमरावती
दू. ०७२१ २६६७८१५

**अथर्व पब्लिकेशन्स**
तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

**माणगावकर एजन्सी**
५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५

## विद्यापीठ : एक संकल्पना

संस्था म्हणून विद्यापीठं स्वतःहून प्रवास करत नाहीत; तर, अनेकांसाठी आकर्षक ठरणाऱ्या संकल्पनेत त्यांचं रूपांतर झाल्यानंतरच विद्यापीठांचा विविध प्रदेशांमध्ये व देशांमध्ये प्रवास सुरू होतो. विद्यापीठ म्हणजे काही केवळ विशिष्ट भौतिक रचना व काही आकडेवारी एवढ्याच चौकटीत अस्तित्त्वात असलेली संस्था नसते. संकल्पनांचं संस्थाकरण करण्याचं काम विद्यापीठं करतात. या संकल्पनांमध्ये वैश्विक मानवी मूल्यं सामावलेली असतात. तर, विद्यापीठ दोन आदर्शलक्ष्यी कार्यं पार पाडतात. एक, मूल्यभारित संकल्पनांचं संस्थाकरण, आणि दोन, या संकल्पनांना निवारा देणं, त्यांचं यजमान होणं. सामाजिक प्रश्नांशी व तीक्ष्ण विद्वत्तेशी दुहेरी बांधिलकी मानणारं सर्जनशील मन अतिशय काळजीपूर्वक विकसित करणं आणि त्याची जोपासना करणं, हे आदर्श अर्थाने विद्यापीठाचं काम असतं. त्यामुळे संस्था म्हणून विद्यापीठाला सर्जनशील मनाविषयी संवेदनशील राहावं लागतं, त्याचप्रमाणे विभिन्न संकल्पनांची भरभराट व्हावी आणि या संकल्पना संस्थात्मक सीमांच्या आत व बाहेर प्रवाहित व्हाव्या, यासाठीची बांधिलकीही विद्यापीठाने पाळणं आवश्यक असतं.

संकल्पना म्हणून विद्यापीठांनी विद्यार्थी समुदायाला स्वतःचं चिंतनशील मन वापरण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवं. याउलट विद्यापीठांनी बडगा उचलला तर त्यातून हिंसाचाराला वाव दिला जातो. संवाद व चर्चा यांना वाव देणाऱ्या संस्कृतीमध्ये जिज्ञासू मनाला प्रस्तुतता लाभते, हे वेगळं नोंदवायला नको. मतभिन्नता दर्शवणाऱ्या सुरांच्या वातावरणात सर्जनशील मनाला चैतन्य लाभतं. विद्यापीठाच्या गाभ्याशी असलेल्या या वैचारिक जीवनाविषयी विद्यापीठ प्रशासन संवेदनशील असेल, तरच हा आदर्श वास्तवात येईल. संस्था म्हणून विद्यापीठं सामाजिक व वैचारिक बांधिलकीची ठोस अभिव्यक्ती करत असतात. चर्चा व मतभिन्नता यांच्यासाठी अवकाश निर्माण करण्यासोबतच मतभिन्नतेला सार्वत्रिक करण्याचं कार्यही विद्यापीठांनी करायचं असतं. विद्यापीठांमधील मतभिन्नतादर्शक सूर व चर्चेची प्रेरणा वैश्विक मानली जाते. ज्ञानशास्त्रीय समतावाद व सामाजिक लोकशाही अशा दोन्ही अर्थांनी ही वैश्विकता विचारात घ्यावी लागते. अशा प्रकारच्या वैश्विक आश्वासकतेला बाधा पोचवली, तर वैध प्रकारे निदर्शनं होणं भाग आहे. वंचित घटकांमधील विद्यार्थ्यांच्या गरजा भागवण्याची जबाबदारी सार्वजनिक विद्यापीठांवर असते. वंचित घटकांमधील विद्यार्थ्यांना संधींचं रूपांतर उपलब्धीमध्ये करण्यासाठी आवश्यक असलेला अवकाश सार्वजनिक विद्यापीठं पुरवतात. जगातील बहुतांश देशांमध्ये हे दिसून येतं. या विद्यार्थ्यांच्या आकांक्षांविषयी राज्यसंस्था उदासीन राहू शकत नाही. विद्यार्थी समुदायाची हाताळणी राज्यसंस्थेने अतिशय काळजीपूर्वक करायला हवी. संकुचित विचारसरणीय प्रवाहापलीकडे जाऊन राज्यसंस्थेने शैक्षणिक संस्थांच्या वैचारिक कल्याणाशी बांधील राहायला हवं, जिवंत आदर्शरूपात कार्यरत असलेल्या विद्यापीठाला पाठबळ पुरवायला हवं; या आदर्शाच्या विपरित वर्तनाला थारा दिला जाऊ नये. नैतिकदृष्ट्या संवेदनशील राज्यसंस्था आणि विद्यापीठ प्रशासन विद्यार्थ्यांकडे राज्यसंस्थेचा किंवा राष्ट्राचा शत्रू म्हणून पाहणार नाहीत. उच्चशिक्षण संस्थांमध्ये इतक्या प्रमाणात हस्तक्षेप केला जात असेल व त्यांना इतक्या तीव्र वैरभावाने विरोध होत असेल, तर विद्यापीठ या संकल्पनेमधील सामाजिक व वैचारिक उद्देशालाच छेद जाईल. एका विद्यापीठातील मतभिन्नतेचे सूर दडपले, तर त्याचा परिणाम म्हणून इतर विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांची मुस्कटदाबी होईल. विद्यापीठांचं महत्त्व नागरी समाजातील सदस्यांनी समजून घ्यायला हवं.

राज्यसंस्थेच्या निधीपुरवठ्यावर कार्यरत असणाऱ्या सार्वजनिक विद्यापीठांनी विद्वत्तेचा सामाजिक पाया विस्तारणं अपेक्षित असतं. लढाऊ सामाजिकता व सहृदय मानवता यांच्यातील सुसंवादाशी ही विद्वत्ता जोडलेली असते. राष्ट्राची वैचारिक उंची मोजण्यासाठीचं प्रमाण विद्यापीठ या संकल्पनेतून मिळतं. या पार्श्वभूमीवर खोटं प्रचारतंत्र वापरून काही विद्यापीठांची प्रतिमा मलीन करणं दुर्दैवी- किंबहुना आत्मघातकी ठरेल. विचारी मनाच्या सखोलपणावर राष्ट्राची नैतिक, सांस्कृतिक व वैचारिक उंची अवलंबून असते, आणि हे उद्दिष्ट गाठण्यासाठीचं प्राथमिक संसाधन म्हणजे विद्यापीठं होत, हे आपण तातडीने समजून घेण्याची गरज आहे. देशातील व परदेशातील निदर्शकांनी याचं महत्त्व जाणलं आहे, त्यामुळे सार्वजनिक संस्थांचा विध्वंस करू पाहणाऱ्यांनी विद्यापीठांना राजकीय गोंधळात ढकलून दिल्यावर विद्यापीठांच्या बचावासाठी चळवळ सुरू झाली आहे.

●

---

## विद्यार्थ्यांच्या निदर्शनांची वाढती लाट

*जवाहरलाल नेहरू विद्यापीठात मुखवटाधारी व्यक्तींनी दहशत बसवण्याचा प्रयत्न केला, त्याचा प्रतिकार करण्यासाठी विद्यार्थी नव्या जोमाने ऐक्य साधून पुढे आल्याचं दिसतं.*

मुखवटे घातलेल्या व्यक्तींच्या जमावाने ५ जानेवारी २०२० रोजी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात शांतता सभेचं आयोजन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर व शिक्षकांवर निष्ठूर हल्ला चढवला. विद्यार्थी व शिक्षक यांना शारीरिक इजा पोचवण्यासोबतच भय व दहशतीचं वातावरण निर्माण करण्याचा उघड उद्देश या हल्ल्यामागे होता. विद्यापीठामधून बाहेर येणाऱ्या व माध्यमांमधून दाखवल्या जाणाऱ्या प्रतिमांद्वारे अनेक प्रश्न उपस्थित होतात. खोल्यांमध्ये नासधूस झालीय, पुस्तकांनी भरलेले लाकडी शेल्फ खाली पडलेत, कुठे प्राथमिक सुविधा असलेलं कपाट पडलंय, तर कुठे हिटर-वजा-स्टोव्ह स्वरूपाचं उपकरण उडालंय, चटया आणि चादरी जमिनीवर अस्ताव्यस्त पडल्यायत - असं चित्र या प्रतिमांमधून समोर येतं. बाबासाहेब आंबेडकरांची चित्रं लावलेली दारं असलेल्या किंवा विशिष्ट सामाजिक ओळखीचे लोक असतील अशा खोल्यांना हेतूतः लक्ष्य करण्यात आलं, असं माध्यमांमधील वार्तांकनातून सूचित होतं.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थी अर्थातच चंगळीचं जीवन जगत नाहीत, पण तिथे निश्चितपणे संपन्न जीवन जगायला मिळतं- हे विचारांचं जीवन असतं, चिकित्सक वृत्ती, सर्जनशीलता आणि विभिन्न जीवनदृष्टी जोपासण्याला चालना देणारी मुक्त संस्कृती इथे अनुभवायला मिळते. यांमध्ये 'डावी' जीवनदृष्टी हा केवळ एक घटक आहे. प्रतिष्ठा व आशा देऊ करणारं हे जीवन असतं. विद्यार्थ्यांना केवळ 'प्रशिक्षण' देऊन न थांबता, त्यांच्या 'शिक्षणा'वर विश्वास ठेवणारं हे विद्यापीठ आहे. इथे बहुसंख्य विद्यार्थी दूरदूरच्या ठिकाणांवरून आलेले वंचित पार्श्वभूमीचे असतात. आपल्या समाजामध्ये मानवतावाद व नैतिकता टिकवून ठेवण्यासाठी ज्ञाननिर्मिती व मूल्यांचं संरक्षण गरजेचं

**पुणे येथे अंक मिळण्याचे ठिकाण**
परिवर्तनाचा वाटसरू,
शॉप नं. ४२०, सिद्धिविनायक केसर, नरपतगिरी चौक, सोमवार पेठ, पुणे ४११०११

आहे आणि त्यासाठी संभाषितांमध्ये व आचारांमध्ये खुला सहभाग असायला हवा, ही परंपरा जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने पाळली आहे. इतक्या दशकांमध्ये इथल्या आवारातील लोकांसाठी सक्षम, स्वतंत्र व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचं काम या विद्यापीठाने केलं. कोणत्याही विद्यापीठाच्या कामकाजासाठी हे महत्त्वाचं असतं.

उच्चशिक्षणाचं आणखी क्रयवस्तूकरण होऊ नये आणि किफायतशीर व गुणवत्तापूर्ण सार्वजनिक शिक्षण मिळण्याचा विद्यार्थ्यांचा अधिकार अबाधित राहावा, यासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी निदर्शनं करत आहेत. वसतिगृहातील प्रस्तावित शुल्कवाढीसंदर्भातील हे आंदोलन दोन महिन्यांहून अधिक काळ सुरू आहे. परंतु, या संदर्भात तोडगा काढण्याचा कोणताही प्रयत्न प्रशासनाने केलेला नाही. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर 'राष्ट्रविरोधी' असल्याचा शिक्का मारून आणि ते ऐतखाऊ आहेत असे शेरे मारून त्यांचं म्हणणं अवैध ठरवण्याचे अनेक प्रयत्न आत्तापर्यंत झाले आहेत. त्याचप्रमाणे या विद्यापीठाची सामाजिक-वैचारिक वीण उसवण्याचेही प्रयत्न झाले. या विद्यापीठातील ग्रंथालयावरील खर्चाच्या चार पटींहून अधिक खर्चाची तरतूद- १७ कोटी रुपयांहून अधिक- सुरक्षिततेसाठी करण्यात आली आहे, तरीही एवढा मोठा शारीरिक हल्ला घडवण्याला मोकळीक दिली गेली. माजी सैनिकांचा समावेश असलेला जुना सुरक्षा कर्मचारीवर्ग काढून टाकून सरकारसमर्थक कळसूत्री शिक्षकांची समांतर समिती स्थापन करण्यासाठी पावलं उचलण्यात आली, यावरून विद्यापीठाच्या आवारात स्वतःच्या सामर्थ्याचं प्रदर्शन कसं केलं जात होतं, हे दिसून येतं.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेबद्दल सहानुभूती राखणाऱ्या शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा या हल्ल्यात कसा सहभाग होता, हे संबंधित छायाचित्रांवरून लक्षात येतं. हा हल्ला ज्या निष्ठूरतेने झाला, त्यावरून 'पदाधिकाऱ्यां'च्या मार्गदर्शनाखाली व संगनमतानेच हे घडल्याचं स्पष्ट होतं. वाटाघाटींपेक्षा किंवा संवादाचा प्रयत्न करण्यापेक्षा दडपशाहीला प्राधान्य देण्याचं विद्यमान सरकारचं धोरण आहे, आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या प्रशासनानेही याच दुराग्रही भूमिकेचं व अरेरावीचं अनुकरण केलं आहे. 'एक इंचही मागे हटणार नाही' असं उच्चारवात सांगणारं विद्यापीठ प्रशासन निष्ठूर शक्तीची भाषा करतं आहे, उत्तरदायित्व नाकारतं आहे आणि त्यांनी ज्या संस्थांची सेवा करणं अपेक्षित आहे त्यांवरील हल्ल्याला प्रोत्साहन देतं आहे.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील संपूर्ण घटनाक्रमावरून हिंसाचाराचं पूर्वनियोजित स्वरूप अधोरेखित होतं. केंद्रीय गृह मंत्र्यांनी 'टुकडे टुकडे गँग'ला शिक्षा करण्याचं आवाहन डिसेंबर २०१९मध्ये दिल्लीतील एका भाषणात केलं होतं, त्याचाही संबंध या हल्ल्याशी असण्याची शक्यता आहे. समाजाचं आणखी विभाजन करण्यासाठी कोण अथकपणे कार्यरत आहे, याबद्दल काही चिंतन करणं हल्लेखोरांना अर्थातच शक्य नव्हतं. त्या ठिकाणी दिल्ली पोलीस मोठ्या संख्येने उपस्थित असूनही मुखवटाधारी हल्लेखोर आवारातून बिनदिक्कत त्यांच्या समोरून निघून गेले; पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली. आपल्या अकार्यक्षमतेचं असं हास्यास्पद प्रदर्शन करणाऱ्या दिल्ली पोलिसांनी ९ जानेवारी रोजी मनुष्यबळ विकास मंत्रालयासमोर निदर्शनं करणाऱ्या विद्यार्थ्यांवर मात्र निर्घृण लाठीमार केला.

'नागरिकत्व (दुरुस्ती) अधिनियम, २०१९' आणि प्रस्तावित 'नागरिकांचा राष्ट्रीय नोंदपट' यांविरोधात रोज सुरू असलेल्या उत्स्फूर्त निदर्शनांमध्ये भयापलीकडे जात संताप व धैर्य दिसतं आहे. इतर वेळी 'राजकारणा'पासून अलिप्त असलेल्या आवारांमधून व लोकांकडूनही हे निषेधाचे सूर उमटत आहेत. या समूहभावनेमध्येच आशेला जागा आहे. निदर्शकांनी सक्षम प्रतिकथनं उभी केली आहेत, त्यांकडे अधिकाधिक लोक आकर्षित होत आहेत आणि नव्याने ऐक्य साधलं जातं आहे. या

निदर्शनांमध्ये वापरली जाणारी विनोदबुद्धी या घडामोडींना जोम पुरवते आहे. निदर्शनांमध्ये आपल्या मुलांसोबत सहभागी होणं आपल्याला भाग पडतं आहे, 'हे किती वाईट आहे' असा विनोद पालक करत आहेत. 'हम देखेंगे' ही उक्ती शब्दशः आचरणात आणून फक्त बघत बसण्याचं काम करणाऱ्या पोलिसांवर लोक हसत आहेत. परंतु, विद्यमान सरकारचा अहंकार आणि वैरभाव अशा विनोदाला दाद देण्याची शक्यता नाही, किंबहुना त्यांना बहुधा याचं आकलनही होणार नाही. उलट, अशा आवाजांना वैरभावाने दडपण्याचा मार्ग सरकार स्वीकारताना दिसतं.

जामिया मिलिया इस्लामिया व अलीगढ मुस्लीम विद्यापीठ यांसारख्या विद्यापीठांवर, त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशात झालेल्या हल्ल्यांना जोडूनच जवाहरलाल नेहरू विद्यापीठात हिंसाचार होतो आहे. यातील आधी उल्लेख केलेल्या घटनांमध्ये राज्ययंत्रणेने स्वतःच उघडपणे विद्यार्थ्यांवर गोळीबार केला आणि ग्रंथालयांवर हल्ले चढवले, तर जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या बाबतीत लोखंडी कांबी व इतर अस्त्रं घेऊन 'खाजगी' जमाव विद्यार्थ्यांवर चालून आला. २०१६ साली मुखवटाधारी जमावाने घोषणाबाजी केली होती, त्याची आठवण या ठिकाणी होते. त्या घोषणाबाजांची ओळख कधीच पटली नाही, पण त्या घटनेचा वापर करून या विद्यापीठाची नाचक्की करण्यासाठी प्रचारतंत्र राबवण्यात आलं. परंतु, अशा हल्लेखोरांना ओळखण्याची क्षमता लोकांमध्ये आहे. मुखवटे असले आणि कपड्यांवरून अंदाज येत नसला, तरी हे हल्ले ज्या निर्घृणतेने होत आहेत, त्यावरून त्यांची ओळख लावता येते. हे अभूतपूर्व हल्ले आहेत आणि सर्व प्रकारच्या मतभिन्नतेला दडपण्याच्या स्पष्ट उद्देशाने हे हल्ले घडवण्यात आले आहेत. विशेषतः इतर ठिकाणांपेक्षा अधिक चिकाटीने व अधिक प्रमाणात निदर्शनं करणाऱ्या विद्यार्थ्यांविरोधात हा हिंसाचार घडवला जातो आहे. या विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी सरकारसमोर गंभीर आव्हान उभं केलं आहे. ●

---

## वित्तीय निवारण व ठेव विमा विधेयकाचं पुनरुज्जीवन झालं तर

*विधेयक पुन्हा मांडलं जाईल, तेव्हा वित्तीय अस्थैर्यासंबंधीचे प्रश्न त्यात हाताळले जातील का?*

'वित्तीय स्थैर्य आणि विकास मंडळा'ची (फायनान्शिअल स्टॅबिलिटी अँड डेव्हलपमेन्ट कौन्सिल : एफएसडीसी) बैठक ७ नोव्हेंबर २०१९ रोजी झाली. देशातील वित्तीय क्षेत्राच्या निवारणविषयक रूपरेषेचं सक्षमीकरण करण्याचा मुद्दा या बैठकीच्या कार्यक्रमपत्रिकेत होता. त्यामुळे विद्यमान सरकार 'वित्तीय निवारण व ठेव विमा विधेयक, २०१७'चं (फायनान्शिअल रिझोल्यूशन अँड डिपॉझिट इन्श्यूरन्स बिल: एफआरडीआय बिल) पुनरुज्जीवित – विशेषतः बँकिंग क्षेत्राच्या संदर्भात– करेल का, यासंबंधी बरेच अंदाज बांधले जात आहेत. हे विधेयक २०१७ साली मांडण्यात आलं, तेव्हा त्यातील 'बेल-इन'च्या तरतुदीसंदर्भात मोठ्या प्रमाणात साशंकता व्यक्त करण्यात आल्यावर वर्षभरात विधेयक सरकारने मागे घेतलं. एखाद्या ढासळत्या वित्तीय संस्थेच्या ठेवीदारांना स्वतःच्या ठेवींच्या काही भागावर पाणी सोडून निवारणाचा ताण स्वतःवर घ्यावा लागेल, असं या कथित तरतुदीचं स्वरूप होतं. भारतातील कौटुंबिक वित्तीय बचत व्यवहार गेल्या दोन दशकांमध्ये बँक ठेवींकडे कलला आहे, अशा वेळी या ठेवींची सुरक्षितता हा निश्चितपणे महत्त्वाचा मुद्दा ठरतो.

माध्यमांमधील बातम्यांनुसार, वित्तीय निवारण व ठेव विमा विधेयकाच्या २०१७ साली मांडलेल्या आवृत्तीत दुरुस्त्या करून आता 'वित्तीय क्षेत्र विकास व नियमन (निवारण) विधेयक, २०१९' असं त्याचं

नामकरण झालं आहे. तीन कळीच्या मुद्द्यांसाठी या दुरुस्त्या होत आहेत: एक, ग्राहकांना ठेव विम्याचं वाढीव संरक्षण मिळावं; दोन, 'बेल-इन' तरतुदीसंदर्भातील वादग्रस्त मुद्दे दूर सारावेत; तीन, ही निवारणाची चौकट सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनाही लागू व्हावी का, हे ठरवलं जावं. सार्वजनिक क्षेत्रातील बँका बुडित कर्जांच्या ताणाखाली आल्या असताना, ठेव विमा संरक्षणाची मर्यादा विस्तारणं हे स्वागतार्ह पाऊल ठरेल. त्यातून एकंदरच ठेवीदारांचा बँकिंग व्यवस्थेवरचा - विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवरचा- विश्वास वाढेल. ठेव विमा योजनेच्या 'समावेशकते'बाबत किंवा इतर बाबींविषयी युक्तिवाद केले जात असले तरी, या दुरुस्त्यांकडे- पर्यायाने एकूणच निवारण चौकटीकडे व्यवस्थात्मक स्थैर्याच्या दृष्टिकोनातून पाहणं प्रस्तुत ठरेल. विशेषतः भारतीय बँकिंग क्षेत्राच्या विद्यमान स्थितीत हे जास्त गरजेचं आहे.

बँकांच्या 'मालकी'ची वित्तीय स्थैर्यात कोणती भूमिका असते, यावर देशात बरीच चर्चा होत आलेली आहे. वित्तीय स्थैर्य आणण्यास बँकांवरील सरकारी मालकीची सकारात्मक भूमिका असते, असं भारतीय रिझर्व बँकेने म्हटलं आहे. याउलट, वित्तीय क्षेत्रात 'स्पर्धात्मक तटस्थतेचा अभाव' निर्माण करण्याचं काम सरकारी मालकीमुळे झाल्याचा ठपका वित्तीय संस्थांच्या निवारणासंबंधीची मसुदा संहिता तयार करणाऱ्या समितीने ठेवला आहे. स्पर्धात्मक तटस्थतेसाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील वित्तीय संस्थांना 'स्पर्धेची समान भूमी' लाभायला हवी, असं प्रतिपादन या समितीने केलं. त्यामुळे सर्व वित्तीय संस्थांसाठी अतिव्यापक अशा निवारण चौकटीची संकल्पना पुढे आली.

या दृष्टिकोनातून २०१७ सालच्या विधेयकाने देशातील वैविध्यपूर्ण वित्तीय क्षेत्राशी निगडित जवळपास २० कायद्यांमध्ये दुरुस्तीचा प्रयत्न केला. रिझर्व बँकेपासून ते बँकेतर वित्तीय कंपन्यांपर्यंत आणि विमा बाजारपेठांसाठी 'विमा नियामक व विकास प्राधिकरण', तारण बाजारपेठा व मुच्युअल फंड यासाठी 'सिक्युरिटीज् अँड एक्सेन्ज बोर्ड ऑफ इंडिया', निवृत्तीवेतन निधींसाठी 'निवृत्तीवेतन निधी नियामक व विकास प्राधिकरण' अशा अनेक संस्थांकडून या क्षेत्राचं नियमन होतं. कोणत्याही ढासळत्या वित्तीय संस्थेच्या निवारणाचं काम एकाच निवारण मंडळाच्या छत्राखाली आणणं, अशी ही संकल्पना आहे. हे सर्वव्यापी निवारण मंडळ देशातील बहुचर्चित वित्तीय स्थैर्याला खरोखर उपयुक्त ठरेल का, हा प्रश्न उपस्थित करणं गरजेचं आहे.

या संदर्भात अनेक मूलभूत प्रश्न पुढे येतात. एक, सार्वजनिक व खाजगी वित्तीय संस्थांची कार्यपद्धती स्पष्टपणे परस्परांहून पूर्णतः भिन्न असते, अशा वेळी त्यांच्यावर मालकीची 'तटस्थता' आणि पर्यायाने स्पर्धा जाणीवपूर्वक लादण्याचा प्रयत्न व्यवहार्य आहे का? खाजगी वित्तीय संस्थांना मुख्यत्वे नफा कमवायचा असतो, तर सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना विविध सामाजिक दायित्व पार पाडायची असतात- उदाहरणार्थ, 'वित्तीय समावेशकते'ला त्यांच्या लेखी प्राधान्य असतं. त्याचप्रमाणे, सार्वजनिक संस्थांच्या बाबतीत, विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील बँकांबाबत, सरकारचा सहभाग (किंवा मालकी) असतो, हा मुद्दा सर्वसामान्यांच्या मनात विश्वास निर्माण करतो, आणि परंपरागतरित्या ते आपली वित्तीय बचत या बँकांमध्ये ठेवण्याला प्राधान्य देतात. 'मालकी'ला तटस्थता देण्याच्या प्रयत्नात सरकारकडून मिळणारी सार्वभौम हमी व निवारणाची ताकद एखाद्या निवारण मंडळाकडे देण्यात आली, तर त्यातून वित्तीय व्यवस्थेत अस्थैर्य निर्माण होईल.

दोन, पहिल्या मुद्द्याला जोडूनच वादग्रस्त 'बेल-इन' तरतुदीचा विचार करता येतो. ठेव विम्याच्या संरक्षण मर्यादेबाहेर असलेल्या कोणत्याही ठेवी या तरतुदीखाली येतील, असा नियम केल्यामुळे २०१७ सालच्या विधेयकातून असं सुचवलं जात होतं की, (सध्या एक लाख असलेल्या) विमा मर्यादेहून वरची रक्कम 'बेल-इन' यंत्रणेमध्ये सामावली जाईल. शिवाय, वित्तीय

अस्थैर्याबाबत रिझर्व बँकेने सावधानतेचा इशारा दिला असला, तरी लघुकालीन कर्जं व विभागवार नोंद नसलेल्या ग्राहक मालमत्ता सध्या या यंत्रणेखाली आहेत. विशेष म्हणजे या तरतुदी व विधेयकही 'वित्तीय स्थैर्य अहवाल, २०१७'च्या पार्श्वभूमीवर आले. देशातील सर्व अधिसूचित बँकांमधील ठेवींच्या वाढीचा वर्षागणिक दर ३.३ टक्क्यांनी खालावल्याचं अहवालातून उघड झालं.

यातून अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. वित्तीय स्थैर्य घसरणीला लागले असतानाही देशांतर्गत वित्तीय संस्थांवरचा ठेवीदारांचा विश्वास आणखी कमी करतील अशा प्रकारच्या निवारणविषयक सुधारणा सरकारने का हाती घेतल्या? विशेषतः व्यवस्थात्मक स्थैर्याचा कणा ठरणाऱ्या संस्थांबाबत सरकारला हे पाऊल का उचलावं वाटलं? या सगळ्या पार्श्वभूमीवर सदर विधेयक पुन्हा मांडण्यात आलं तर त्यातील संभाव्य दुरुस्त्यांबाबत आपण कितपत आशावादी राहू शकतो? ●

---

## इंटरनेटबंदीविषयीचा निराशाजनक निकाल

*जम्मू-काश्मीरमध्ये इंटरनेटवर लादलेली मनमानी बंदी उठवण्याकडे सर्वोच्च न्यायालयाचा काणाडोळा*

अनुच्छेद ३७० काढून टाकल्यानंतर पूर्वीच्या जम्मू-काश्मीर राज्यामध्ये इंटरनेटवर बंदी घालण्यात आली, त्या संदर्भातील 'अनुराधा भसीन विरुद्ध भारतीय संघराज्य (२०२०)' या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल निराशाजनक आहे. मुक्त अभिव्यक्ती, प्रसारमाध्यमं, इंटरनेट यांना अभिव्यक्तीची साधनं म्हणून महत्त्व आहे आणि विवेकी सुव्यवस्था व प्रक्रिया राखणं गरजेचं आहे, यावर न्यायालयाने प्रदीर्घ खल केला आहे. पण, निकालातील 'निष्कर्ष' परस्परविरोधी स्वरूपाचे आहेत आणि निकालपत्रातील चर्चेशी त्यांची फारशी संगती नाही.

उदाहरणार्थ, जम्मू-काश्मीरमध्ये इंटरनेटबंदी लावणाऱ्या आदेशांच्या प्रती पुरवण्यास नकार देण्याची मुभा सरकारला का नाही, याची चर्चा न्यायालयाने केली आहे. सर्व आदेशांच्या प्रती पुरवणं शक्य नाही, असा युक्तिवाद सरकारच्या वतीने महान्यायवाद्यांनी (सॉलिसिटर जनरल) केला. यासाठी त्यांनी 'विशेषाधिकारां'चं कारण दिलं, परंतु या दाव्याला कोणता कायदा परवानगी देतो, हे त्यांना सांगता आलं नाही. विशेषाधिकाराचा दावा मागे घ्यावा लागल्यावर 'नमुना आदेश' सादर करण्यात आले.

अशी अवज्ञा झाल्यानंतरही न्यायालयाने त्यावर काहीही केलं नाही. एखादा दस्तावेज सोबत बाळगणाऱ्या पक्षाने तो न्यायालयात सादर करायलाच हवा अथवा न्यायालयाने अशा पक्षाविरोधात विपरित निष्कर्ष काढावा, हा पुराव्याविषयीचा सर्वांत महत्त्वाचा नियम आहे. इंटरनेटवरील बंदीच्या आदेशाची प्रत सरकारने सादर केली नाही, त्यामुळे असे आदेश अस्तित्त्वातच नाहीत असं न्यायालयाने गृहित धरायला हवं होतं, परिणामी इंटरनेटवरील बंदी बेकायदेशीर ठरून ती तत्काळ उठवली जायला हवी होती. परंतु, न्यायालयाने असं काही केलं नाही, उलट सरकारला व्याकूळ होऊन विनवणी केली की, सरकारने इंटरनेटबंदीच्या आदेशाची प्रत किमान प्रकाशित करावी, जेणेकरून भविष्यात कधीतरी लोकांना त्या आदेशांना आव्हान देता येईल.

उर्वरित मुद्द्यांवरही न्यायालयाने अशीच भूमिका घेतली आहे. अधिकार, राष्ट्रीय सुरक्षा, मूलभूत स्वातंत्र्य, इत्यादींबाबत मोठमोठे शब्द वापरले आहेत, आणि त्यात बहुतांशाने सरकारी युक्तिवाद फेटाळण्यात आला आहे, पण त्यानंतर याचिकाकर्त्यांना काहीही अर्थपूर्ण दिलासा मिळेल अशी तजवीज या निकालपत्रात नाही. सरकारला न्यायालयाने दिलेल्या दोन 'आदेशां'मध्ये त्यांच्या पालनासाठी कोणतीही कालमर्यादा नाही आणि या आदेशांची भाषा इतकी ढोबळ आहे की 'पालना'चा

दावा करण्यासाठी सरकारला काही क्षुल्लक प्रयत्न करूनही पुरेल. किंबहुना, अलीकडेच जम्मू-काश्मीरच्या काही भागांमध्ये विशिष्ट संकेतस्थळांवरील बंदी उठवण्यात आली आहे, परंतु इतरत्र बंदी सुरूच आहे, तरीही या कृतीद्वारे आपण न्यायालयाच्या आदेशांचं 'पालन' केलं आहे, असा दावा करता येईल.

परखडपणे सांगायचं तर, इंटरनेटबंदीच्या ढोबळ विषयावरील धोरणसंहितेसारखं हे निकालपत्र आहे, त्यात सरकारला काही सूचना व शिफारसी केलेल्या आहेत, पण सरकारी कृतीवर चाप बसवण्याकरिता राज्यघटनाधारित न्यायालयाकडून अपेक्षित असतो तसा काही हुकूम यात काढण्यात आलेला नाही. इतक्या आवाक्याच्या प्रश्नावर अशा प्रकारचा निवाडा देणं, हे एक तर संगनमताचं लक्षण आहे किंवा भ्याडपणा आहे- वाचकांनी आपापले निष्कर्ष काढावेत.

भारताव्यतिरिक्त इतर कोणत्याही देशात लोकांना इतक्या प्रमाणात इंटरनेटबंदी सहन करावी लागत नाही. जम्मू-काश्मीरमध्ये सध्या लादण्यात आलेली इंटरनेटबंदी गेले पाचहून अधिक महिने टिकून आहे; दरम्यानच्या काळात क्वचित काही ठिकाणी काही वेळा मर्यादित प्रमाणात इंटरनेट उपलब्ध करून देण्यात आलं आहे. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७४'मधील अनुच्छेद १४४ (वासाहतिक सत्ताकाळापासून ही तरतूद जवळपास कोणत्याही बदलाविना टिकून आहे) आणि 'तार अधिनियम, १८८५'मधील कलम ७ अंतर्गत तयार करण्यात आलेले 'दूरसंचार सेवांच्या तात्पुरत्या निलंबनाविषयीचे (सार्वजनिक आणीबाणी वा सार्वजनिक सुरक्षितता) नियम, २०१७' या आधारावर सरकारने स्वतःच्या उपाययोजनांचा कायदेशीर आधार उभा केला. या दोन्ही कायद्यांची मुळं वासाहतिक कायदाव्यवस्थेमध्ये आहेत, यावरून इंटरनेटबंदीच्या मुद्द्यावर आपल्याला बरंच काही कळून जातं.

भारतीय जनतेतील बऱ्याच मोठ्या समुदायाच्या जगण्याचा इंटरनेट हा एक महत्त्वाचा भाग आहे. आता काही केवळ शहरी, मध्यमवर्गीय, इंग्रजी जाणणाऱ्या वर्गाची इंटरनेटवर मक्तेदारी उरलेली नाही. स्वस्तातील जोडणी व बहुभाषिक आशय यांमुळे भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या जवळपास ५० कोटींपर्यंत पोचली आहे. या बाबतीत चीननंतर भारताचा क्रमांक येतो.

इंटरनेटच्या उपलब्धतेमधील या विस्तारामुळे राज्यसंस्थेच्या क्षमतेपुढे विरोधाभासात्मक समस्या उभी राहिली- इंटरनेटचा अधिकाधिक स्वीकार व्हावा यासाठी सरकार प्रोत्साहन देतं, पण इंटरनेटच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी व त्यावर दंड करण्यासाठी आवश्यक क्षमता सरकारने विकसित केलेली नाही. त्यामुळे भारतभरात इतक्यांदा सरकारला निष्ठूरपणे इंटरनेटबंदी लादावी लागते, याला दोन घटक कारणीभूत आहेत. एक, चिघळत जाणाऱ्या परिस्थितीत पोलिसांना व राज्ययंत्रणेला हे बंदीचं साधन हाताशी सहज उपलब्ध असतं, आणि त्याहून चांगला मार्ग त्यांना माहीत नसतो. दोन, सर्वसाधारण जनतेविरोधात इंटरनेटबंदीसारखे उपाय सरसकटपणे व अवैधपणे वापरले तरीही त्याचे काहीच परिणाम भोगावे लागत नाहीत. इंटरनेटबंदीमुळे भौतिक नुकसान सहन करावं लागलेल्या माणसाच्या अडीअडचणींबाबत कोणताही उपाय नाही.

अनुराधा भसीन खटल्याच्या निमित्ताने इंटरनेटबंदीसंदर्भातील किमान दुसऱ्या घटकावर उपाय करण्याची संधी न्यायालयाला मिळाली होती. बहुतेकदा सरकार इंटरनेटबंदी लादतं, त्यामागे राष्ट्रीय सुरक्षेविषयी किंवा कायदा व सुव्यवस्थेविषयी आस्था फारशी नसते. उलट, मतभिन्नता दर्शवणाऱ्या लोकांना सरसकटपणे शिक्षा करणं, हा यामागचा उद्देश असतो. अशा वेळी घटनेनंतरच्या उत्तरदायित्वाची मागणी तरी सरकार करू शकतं. परंतु, जॉर्ज बर्नार्ड शॉ यांचे शब्द थोडे फिरवून बोलायचं तर, सरकारने पुन्हा एकदा संधी गमवायची संधी साधली आहे. यातून सरकार स्वतःची विश्वासार्हता व आपले अधिकार या दोन्हींसमोर अडथळे उभे करतं आहे. ●

# ट्रम्प आणि तेहरान

*युद्धाविषयीची अमेरिकेची बुभुक्षा पुन्हा एकदा जागतिक शांततेसाठी धोकादायक ठरते आहे.*

अमेरिकेने ३ जानेवारी रोजी ड्रोन हल्ला करून इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स- क़्दस् फोर्सचे मेजर जनरल कासम सोलेमनी आणि इराकच्या पॉप्युलर मोबिलायझेशन फोर्सेसचे उप-सेनाधिकारी अबू महदी अल-मुहांदीस यांची हत्या केली, त्यानंतर पश्चिम आशियात नव्याने हिंसेचं चक्र सुरू झालं आहे. २०२० हे हिंसेचं वर्षं असेल, असं डोनाल्ड ट्रम्प सरकारने स्वतःच्या कृतीतून निःसंदिग्धपणे जाहीर केलं आहे. अमेरिकेच्या उद्दामपणाला प्रत्युत्तर देताना इराणने इराकमधील अनबार प्रांतातील अईन अल-असाद या अमेरिकी तळावर आणि एर्बिलमधील एका तळावर हल्ला केला.

अमेरिकेतील उदारमतवादी (लिबरल) असोत किंवा पुरातनवादी (कन्झर्वेटिव्ह) असोत, तिथल्या सर्व अभिजनांना अमेरिकी सैनिकी वर्चस्वावरील श्रद्धेनं आंधळं केलेलं आहे. आपल्या नियमाप्रमाणे चालणं हीच जगाची नियती आहे, अशी या लोकांची खात्री असते. त्यामुळे अमेरिका सैनिकी संयम राखेल ही अपेक्षाच फोल आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीपासून अमेरिका स्वतःच्या शस्त्रास्त्र तंत्रज्ञानाच्या चाचणीसाठी पश्चिम आशियाचा वापर करत आली आहे. ७० अब्ज डॉलर इतका वार्षिक सैनिकी अर्थसंकल्प असलेली अमेरिका जागतिक शांततेला कधीच वास्तवात येऊ देणार नाही. आता अमेरिका नव्याने हल्ले करायच्या तयारीत असल्यामुळे पश्चिम आशियात राजनैतिक अवकाशामध्ये काळोखी पसरली आहे.

राजनैतिक संरक्षण लाभलेल्या एका परदेशी नेत्यावर उघडपणे सैनिकी कारवाई करणं, हे व्यावसायिक सैनिकी नीतिमत्तेचं विडंबन आहे. युद्धभूमीचे आयाम वाढवण्याचा हा निर्लज्ज प्रयत्न आहे. राज्यसंस्थाकेंद्री आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये परदेशी नेत्यांच्या हत्येला निषिद्ध मानलेलं आहे. अशा प्रकारच्या हत्या 'विश्वासघातकी' असल्याचं म्हणत १९०७च्या 'हेग कन्व्हेशन'ने त्यांना निषिद्ध मानलं आहे. ट्रम्प सरकारच्या कृती नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा विध्वंस करत आहेत आणि राजनैतिक हत्या कायदेशीर मानणाऱ्या मध्ययुगीन रानटीपणाचं युग परत आणणाऱ्या या कृती आहेत.

सोलेमनी 'दीर्घ काळ हजारो अमेरिकींच्या हत्येला किंवा त्यांना जबर जखमी करण्याला जबाबदार होता, आणि आणखी हत्या करायची त्याची योजना होती... पण आता तो संपलाय', असं म्हणत अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या रानटी कृतीचं समर्थन केलं. फ्लोरिडातील पाम बीचवरील स्वतःच्या रिसॉर्टमध्ये ट्रम्प यांनी असा दावा केला की, युद्ध थांबवण्यासाठी हा हल्ला करण्यात आला, युद्ध सुरू करण्यासाठी आम्ही ही कारवाई केलेली नाही. वस्तुतः राजनैतिक औपचारिकता व सार्वभौम संरक्षणं यांचा भंग करत असताना अमेरिका पुन्हा एकदा सैनिकी मार्गांचा वापर करते आहे.

१९७०च्या दशकाच्या मध्यात निर्माण झालेलं तेलसंकट आणि तिसऱ्या जगातील देशांनी केलेली नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी, या पार्श्वभूमीवर हेन्री किसिंजर यांनी अमेरिकेच्या नेतृत्वाखालील 'मिडल-इस्ट ऑर्डर' बसवली, परंतु ती आता जर्जरावस्थेत आहे. ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारावेळी पश्चिम आशियातील युद्धांमधील अमेरिकेच्या सहभागाविरुद्ध झोड उठवली होती, पण २०१७ साली त्यांची भूमिका बदलली. त्यांनी पद्धतशीररित्या व बेलगामपणे ही 'ऑर्डर' म्हणजे विशिष्ट व्यवस्था उद्ध्वस्त करायला सुरुवात केली. इराणसोबतच्या आण्विक करारातून त्यांनी एकतर्फी माघार घेतली, जेरुसलेमला इस्रायलची राजधानी म्हणून मान्यता दिली व अमेरिकी

दूतावास तिथे हलवला, इराणमधील जनतेवर जालीम आर्थिक निर्बंध लादले, आणि इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स या दलाला दहशतवादी संघटना जाहीर केलं. इराणवर अधिकाधिक दबाव आणून त्यांच्या 'सामरिक संयमा'ची कसोटी पाहण्यासाठी या चिथावणीखोर कृती केल्या गेल्या.

सिरियातील युद्धामधला इराणचा सहभाग आणि 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया' (इसिस) या गटाविरोधातील इराणचा लढा, याला अमेरिका व त्यांच्या प्रादेशिक मित्रदेशांचा विरोध आहे. इथली प्रादेशिक जोडणी वृद्धिंगत झाली, तर अमेरिकेच्या साम्राज्यवादी गरजांची पूर्तता करणाऱ्या सांप्रदायिक राजकीय सत्ता उलथण्याची शक्यता आहे. इराकमधील राष्ट्रवादी उसळीने आणि इराकी भूमीवरून अमेरिकी दलं मागे घ्यावीत या वाढत्या मागणीने अमेरिका अस्वस्थ झाली आहे.

या प्रदेशातील सर्वांत गरीब राष्ट्र असलेल्या येमेनमध्ये तुलनेने लहान बंडखोर गट असलेले हौथी व दुबळं सरकार यांच्यात युद्ध सुरू आहे, आणि इराण व सौदी अरेबिया यांच्यातील शत्रुत्वामध्ये हा मध्यवर्ती घटक ठरतो, ही विचित्र बाब म्हणावी लागेल. प्रादेशिक ऐक्य अमेरिकेच्या रणनीतीला अनिष्टकारक आहे. जगातील तेलाचा सर्वांत मोठा निर्यातदार देश व्हायची अमेरिकेची मनिषा आहे आणि त्यानुसार या प्रदेशातील अमेरिकेची रणनीती राबवली जाते. शिवाय, शिया-सुन्नी ऐक्य साधलेला इहवादी पश्चिम आशिया इस्राएलच्या भयगंडामध्ये भर टाकणारा ठरेल. १९७०च्या दशकात विकसनशील व गरीब देशांमध्ये ऐक्य साधू पाहणाऱ्या एका गटामधून पश्चिम आशियाला बाजूला काढण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला होता. स्वतःची प्रभुत्वसत्ता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेने या प्रदेशाचा वापर केला, आणि आता इथल्या देशांना गरीब राष्ट्रांच्या कोटीत ढकलण्याची अमेरिकेची इच्छा आहे.

इराणला बगदादपासून बैरुतपर्यंत जाणारा मार्ग बांधायचा आहे, जेणेकरून इराकी, लेबननी व सिरियन बंदरांमधून त्यांना थेट भूमध्य समुद्राकडे जाणं शक्य होईल. हे या प्रदेशातील भूराजकीय वास्तव आहे. अमेरिका, इस्राएल व सौदी अरेबिया यांना ही योजना बिघडवायची आहे, कारण इराणची योजना प्रत्यक्षात आली तर अमेरिकी नौदलाचं नियंत्रण असलेल्या समुद्री संदेशन मार्गांपासून इथला प्रादेशिक व्यापार मुक्त होईल. इंग्लंड व अमेरिका यांनी पहिलं महायुद्ध सुरू केलं, तेव्हाही अशाच प्रकारचा घटक कारणीभूत ठरला होता, हे विसरता कामा नये- बर्लिन ते बगदाद रेल्वे बांधण्याची जर्मनीची योजना होती, परंतु तसं झाल्यास सुएझ कालव्याचं महत्त्व कमी झालं असतं, त्यामुळे पहिल्या महायुद्धाची ठिणगी पडली.

अमेरिका व इराण यांमधील वाढत्या तणावामुळे हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद होण्याची शक्यता आहे. जगातील तेलाची २० टक्के समुद्री वाहतूक या भागातून होते. मालवाहतूकीच्या सर्वसामान्य प्रवाहामध्ये अशा प्रकारे अडथळा आल्याने तेलाच्या किंमती वाढण्याची आणि जागतिक अर्थव्यवस्था असुरक्षित होण्याची शक्यता आहे. गेली काही वर्षं आर्थिक वाढ मंदावलेल्या भारताला या परिस्थितीशी जुळवून घेणं अवघड जाईल. भारतीय परराष्ट्र धोरण ठरवणाऱ्यांनी ट्रम्प सरकारसोबतची जवळीक वापरून जागतिक संभाषित शांततेच्या दिशेने वळवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. अर्थात, भारताने यात मध्यस्थी करावी अशी अमेरिकेची इच्छा असेल तरच हे शक्य होईल.

●

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाऊंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (११, १८ व २५ जानेवारी २०२० या अंकांतून. 'विद्यापीठ : एक संकल्पना' आणि 'आम्ही भारताचे लोक' ही दोन संपादकीये गोपाळ गुरू यांनी लिहिले आहेत.)